क्रमांक महसूल/कार्या/1/कां.व/2019
जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
दिनांक:- 15-05-2019

प्रति,

मा.विभागीय आयुक्त, कोकण विभाग
कांदळवन सरंक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती
तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष,
फोर्ट, मुंबई 400 001.

M572

विषय:- **कांदळवनाच्या -हासाबाबतच्या तक्रारीचा पूर्तता अहवाल.**

संदर्भ:- कांदळवन सरंक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीकडे दिनांक 22-03-2019 रोजी प्राप्त झालेली तक्रार
तक्रारदार श्री.महेश धोंडू चव्हाण, रा.502, झेनिथ टॉवर, प्लॉट न.3 डी, सेक्टर 46अ, सी वूडस नेरुळ नवी मुंबई
तक्रार नंबर 63

महोदय,

मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक 3246/2004 मध्ये दिनांक 6/10/2005 रोजी दिलेला निर्णय व त्यातील रुपांतरीत जनहित याचिका क्रमांक 87/2006 मध्ये दिनांक 27/01/2010 रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने श्री. **महेश धोंडू चव्हाण** यांनी दिनांक **22/03/2019** रोजी कांदळवनाच्या/पाणथळाच्या -हासाबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन, केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

**कांदळवन तक्रारीचा पूर्तता अहवालाचा नमुना**

| अ.क्र | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| 1 | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री.महेश धोंडू चव्हाण |
| 2 | तक्रारीचा विषय | मौजे निवेंडी येथील सर्व्हे नंबर 151/1 क्षेत्र 1.59.0+ खराबा 0.38.40 या मिळकतीतील कांदळवनातील झाडे श्री.विजय सिताराम राजवाडकर यांनी बेकायदेशीर तोडल्याबाबत |
| 3 | तक्रारीशी संबंधीत जागेचा तपशील उदा.स.नं., गावाचे नांव, तालुका | मौजे निवेंडी ता.रत्नागिरी येथील सर्व्हे नंबर 151/1 क्षेत्र 1.59.0+ खराबा 0.38.40 |
| 4 | चौकशी करणा-या अधिका-याचे नांव व पदनाम | उपविभागीय अधिकारी रत्नागिरी |
| 5 | चौकशी मध्ये आढळून आलेली वस्तूस्थिती | मौजे निवेंडी ता.जि.रत्नागिरी येथील स.नं.151 हि.नं.1 या मिळकतीत श्री.विजय सिताराम राजवाडकर यांनी कांदळवन झाडे तोडून नष्ट केली असल्याबाबत दिनांक 12-02-2019 रोजी प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर मिळकतीची दिनांक 2-03-2019 रोजी परिक्षेत्र वन अधिकारी रत्नागिरी व निवासी नायब तहसीलदार रत्नागिरी यांनी जमीनमालक श्री.राजवाडकर, गांवचे |

| | | |
|---|---|---|
| | | सरपंच, पोलीस पाटील व इतर ग्रामस्थ तसेच वन विभागाचे कर्मचारी यांचे समवेत सकाळी 12.00 वाजता स्थळपहाणी केली असता सदर क्षेत्राच्या चारही बाजूने जमीन मालक श्री.राजवाडकर यांनी त्यांच्या क्षेत्राच्या हदद समजावून दिल्या. सदर क्षेत्रात फिरुन पहाता साफसफाई केलेली दिसून आली. साफसफाई केलेल्या क्षेत्राचा अंदाज करता सुमारे 35 गुंठे इतके क्षेत्र होत आहे. सदर क्षेत्रामध्ये जी झाडे आहेत ती उन्मळून जाळलेली दिसून आली. तसेच सदरची झाडे ही सुबाभुळे 5, मोहट 5, आकेशिया 3, बांबू बेट 2, हुरी 12 व तिवर 2 अशी एकूण 29 झाडे होत आहेत. सदरची झाडे-झुडूपे जाग्यावर ठिकठिकाणी पडलेली दिसून येतात. मोहट झाड 1 हे 100 से.मी.व्यासाचे असून बाकी सर्व झाडे 15 ते 40 से.मी.इतकी व्यासाची आहेत. सदर झाडापासून निघणा-या किटा मालाबाबत अंदाज करता सुमारे 15.00 घनमीटर इतका होईल. सदरचा लाकूड माल श्री.विजय राजवाडकर यांचे ताब्यात पावतीने दिलेला असून त्यांना पुढील निर्णय होईपर्यत जागेवरुन न हलवणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच सदर जमिनीचा 7/12 पहाता त्यावर कांदळवन अशी कोणतीही नोंद दिसून येत नाही मात्र भातशेती अशी नोंद दिसून येते. दाखविलेले क्षेत्र हे कांदळवन असल्याचे दिसून येत नाही. श्री.राजवाडकर यांनी दाखविलेल्या क्षेत्रामध्ये आजूबाजूची माहिती घेता दक्षिणेकडील भागात मालकी क्षेत्र दिसून येत आहे. उत्तरेकडील बाजूने बंधारा, पश्चिमेकडील बाजूनी खाडी भाग तसेच पूर्वेकडील बाजूने मालकी क्षेत्र दिसून येत आहे. मात्र सदर क्षेत्रात केलेल्या कामकाजाबाबत श्री.विजय सिताराम राजवाडकर यांनी विचारणा करता ही साफसफाई आपण स्वत: केलेली असून हे काम नारळ झाडे लावण्यासाठी केलेले असल्याचे सांगितले आहे. सदर क्षेत्रात पंचनाम्यात नमूद केलेल्या झाडांव्यतिरीक्त कोणत्याही प्रकारच्या झाडांची बुंदे दिसून येत नाहीत. नमूद केलेले 35 गुंठे क्षेत्र हे उकरलेल्या स्थितीत दिसून येते.<br><br>प्रकरणी तक्रारदार श्री.चव्हाण यांनी दि.11-03-2019 रोजी परत अर्ज सादर केला असून दि. 2-03-2019 रोजी स्थळपहाणीच्या वेळी त्यांना कोणतीही माहिती किंवा बोलावणे न करता सदर तक्रारीचे निरसन आपल्या कार्यालयातील अधिका-यांमार्फत करण्यात आले तसेच सदर प्रकरण श्री.शामराव पाटील, मंडळ अधिकारी मालगुंड यांना हाताशी धरुन परस्पर मिटविण्याचा प्रयत्न केला गेला आहे अशी तक्रार केली आहे.<br><br>दि.2-03-2019 रोजी सकाळी 12.00 वाजता स्थळपहाणी व स्थानिक चौकशी वेळी तक्रार अर्जदार हे मुंबई येथे असल्याने उपस्थित नव्हते. स्थळपहाणीत केलेल्या पंचयादीत तक्रार अर्जदार स्थळपहाणीचे दिवशी |

| | | |
|---|---|---|
| | | मुंबई येथे असल्याचे नमूद आहे. त्यामुळे मंडळ अधिकारी मालगुंड यांनी सदर प्रकरण परस्पर मिटविण्याचा प्रयत्न केला आहे हे तक्रार अर्जदार यांच्या म्हणण्यात तथ्य दिसून येत नाही. प्रस्तुत प्रकरणी संबंधीत जमिनीचा 7/12 पहाता श्री.विजय राजवाडकर व इतर 5 यांचे खाजगी मालकी 7/12 सदरी दिसून येत आहे. तसेच 7/12 सदरी कांदळवन अशी कोणतीही नोंद नाही. तसेच क्षेत्र कांदळवन म्हणून शासनाकडून घोषीत करणेत आलेले नाही. प्रस्तुतचे क्षेत्रात कांदळवन नसल्याचे पंचयादीवरुन दिसून येते. |
| 6 | कांदळवनाचा -हास झाला आहे किंवा नाही | नाही |
| 7 | कांदळवनाचा -हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधीत पोलीस स्थानकाचे नांव | ---- |
| 8 | कांदळवनाचा -हास झाला असल्यास, ज्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नांवे व पत्ता | ---- |
| 9 | कोणत्या कायद्याअंतर्गत/कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | ---- |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असून, सोबत जबाब व पंचनाम्याची प्रत सादर केलेली आहे. तरी प्रकरणी कांदळवनाची तोड झाल्याचे दिसून येत नसल्याने अर्जदार यांचा अर्ज निकाली ठेवण्यात यावा असे मत आहे.

सोबत पृष्ठ क्र.1 ते 9 आहेत.

आपला विश्वासू,

(दत्तात्रय भडकवाड)
**निवासी उपजिल्हाधिकारी रत्नागिरी**

(6) E-3730919/19



दिनांक 02-03-2019

क्र.उविअर/एलएनए/तक्रार अर्ज/कावि/135/2019.

प्रति,

मा.जिल्हाधिकारी रत्नागिरी
(महसूल शाखा)

जिल्हाधिकारी कार्यालय
शाखा : 
आवक नं. 123/2
दि. 05 MAR 2019

विषय : मौजे निवेंडी येथील स.नं.151/1, क्षेत्र 1-97-40 या मिळकतीतील कादळवनातील झाडे श्री. विजय सिताराम राजवाडकर यांनी बेकायदेशीरपणे तोडल्याबाबत.

संदर्भ : 1. आपलेकडील पत्र क्र. महसूल/कार्या-1/कावि/62/2019, दिनांक 14-02-2019.
2.तहसिलदार रत्नागिरी यांजकडील पत्र क्र.तह/जबाबी-2/निवेंडी स्थळ पहाणी/2019, दि. 02-03-2019.

महोदय,

आपलेकडील संदर्भीय पत्रान्वये श्री. महेश धोंडू चव्हाण.रा. भोम, ता.चिपळूण,जि.रत्नागिरी यांचा मौजे निवेंडी ता.जि.रत्नागिरी येथील स.नं.151 हि.नं.1 या मिळकतीत श्री. विजय सिताराम राजवाडकर यांनी कांदळवन झाडे तोडून नष्ट केली असल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने निवासी नाबय तहसिलदार व परिक्षेत्र वनअधिकारी रत्नागिरी यांनी संयुक्तीक स्थळपहाणी करुन प्रकरणी सादर केलेला अहवाल खालीलप्रमाणे आहे.

दिनांक 02-03-2019 रोजी सकाळी 12.00 वा परिक्षेत्र वनअधिकारी व निवासी नायब तहसिलदार यांनी स्थळपहाणी केली असता सदर ठिकाणी मंडळ अधिकार मालगुंड, परिक्षेत्र वनअधिकारी रत्नागिरी यांचे कर्मचारी, भगवतीनगर (निवेंडी) सरपंच, पोलिस पाटील व जमिन मालक श्री. विजय सिताराम राजवाडकर तसेच पंच व ग्रामस्थ उपस्थित होते. सदर क्षेत्राच्या चारही बाजूने जमिन मालक श्री. राजवाडकर यांनी हदद समजावून दिल्या. सदर क्षेत्रात फिरुन पाहता साफसफाई केलेली दिसून आली. साफसफाई केलेल्या क्षेत्राचा अंदाज करता सुमारे 35 गुंठे इतके क्षेत्र होत आहे. सदर क्षेत्रामध्ये श्री. चव्हाण यांची जी झाडे आहेत ती उन्मळून जाळलेली दिसन येतात. तसेच सदरची झाडे ही सुबाभुळे 5, मोहट 5, आकेशिया 3, बांबू बेट 2, हुरी 12 व तिवर 2 अशी एकूण 29 झाडे होत आहेत. सदरची झाडे-झुडपे जाग्यावर ठिकठिकाणी पडलेली दिसून येतात. मोहट झाड 1 हे 100 से.मी. चे असून बाकी सर्व झाडे 15 ते 40 से.मी. इतकी आहेत. सदर झाडापासून निघणाऱ्या किटा मालाबावत अंदाज करता सुमारे 15.00 घनमीटर इतका होईल. सदरचा लाकूड माल री. विजय राजवाडकर यांचे ताब्यात पावतीने दिलेला असून त्याचा पुढील निर्णय होईपर्यंत जागेवरुन न हलवणेबाबत सूचना दिलेल्या आहेत. तसेच सदर जमिनीचा 7/12 पाहता त्यावर कांदळवन अशी कोणतीही नोंद दिसून येत नाही. मात्र भातशेती अशी नोंद दिसून येते. दाखविलेले क्षेत्र हे कांदळवन असल्याचे दिसून येत नाही. श्री. राजवाडकर यांनी दाखविलेल्या क्षेत्राप्रमाणे आजूबाजुची माहीती घेता दक्षिणेकडकील भागात मालकी क्षेत्र दिसून येत आहे. उत्तरेकडील बाजूने बंधारा, पश्चिमेकडील बाजूने खाडी भाग तसेच पूर्वेकडील बाजून मालकी क्षेत्र दिसून येत आहे. मात्र सदर क्षेत्रात केलेल्या कामकाजाबाबत श्री. विजय सिताराम राजवाडकर यांना विचारणा करता ही साफसफाई आपण स्वत: केलेली असल्याचे सांगत हे काम नारळ झाडे लावण्यासाठी केलेले असल्याचे सांगत आहेत. सदर क्षेत्रात पंच नाम्यात नमुद केलेल्या झाडांव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या झाडाची बुंदे दिसून येत नाहीत. नमुद केलेले 35 गुंठे क्षेत्र हे उकरलेल्या स्थितीत दिसून येते.सोबत निवासी नायब तहसिलदार रत्नागिरी यांजकडील अहवाल पंचयादीसह पृष्ठ क्र. 1 ते  आपलेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करणेत येत आहे.

आपला विश्वासू,

उपविभागीय अधिकारी
रत्नागिरी उपविभाग

कावि. 82
7/03/2019

D:\SDO Backup\LNA\sample Unicode 123a.doc



पृष्ठ 7

क्र.उविअर/एलएनए/तक्रार अर्ज/कावि/135/2019.

दिनांक 15-05-2019.

प्रति,

मा.जिल्हाधिकारी रत्नागिरी
(महसूल शाखा)

विषय : मौजे निवेंडी येथील स.नं.151/1, क्षेत्र 1-97-40 या मिळकतीतील कांदळवनातील झाडे श्री. विजय सिताराम राजवाडकर यांनी बेकायदेशीरपणे तोडल्याबाबत.

संदर्भ : 1. आपलेकडील पत्र क्र. महसूल/कार्या-1/कावि/82-89/2019, दिनांक 13-03-2019.
2.या कार्यालयाकडील पत्र क्र. एलएनए/तक्रार अर्ज/कावि/135/2019, दि. 02-03-2019.

महोदय,

आपलेकडील संदर्भातील अ.क्र.01 च्या पत्रास अनुसरुन खालीलप्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे.

मौजे निवेंडी ता.जि.रत्नागिरी येथील स.नं.151 हि.नं.1 या मिळकतीत कांदळवन झाडे नष्ट केली असल्याबाबत श्री. महेश धोंडू चव्हाण. रा. भोम, ता.चिपळूण यांनी केलेल्या तक्रार अर्जाची चौकशी निवासी नायब तहसिलदार रत्नागिरी. परिक्षेत्र वनअधिकारी रत्नागिरी, मंडळ अधिकारी मालगुंड, परिक्षेत्र वनअधिकारी यांचे कर्मचारी, भगवतीनगर (निवेंडी) सरपंच, पोलिस पाटील व जमिन मालक श्री. विजय सिमाराम राजवाडकर, ग्रामस्थ पंच यांनी दि. 2-03-2019 रोजी सकाळी 12.00 वाजता स्थळपहाणी केलेली आहे.सदर वेळी स्थानिक चौकशी करणेत आली असता तक्रार अर्जदार हे मुंबई येथे असल्याने उपस्थित नव्हते, असा अहवाल निवासी नायब तहसिलदार यांनी त्यांचे दिनांक 2-03-2019 रोजीचे पत्रान्वये कळविले आहे. स्थळपहाणीबाबत केलेल्या पंचयादीत तक्रार अर्जदार स्थळपहाणीचे दिवशी मुंबई येथे असल्याचे नमुद आहे. त्यामुळे मंडळ अधिकारी मालगुंड यांनी सदर प्रकरण परस्पर मिटविण्याचा प्रयत्न केला आहे हे तक्रार अर्जदार यांच्या म्हणण्यात तथ्य दिसून येत नाही.

प्रस्तूत प्रकरणी संबंधित जमिनीचा 7/12 पाहता खाजगी मालकी 7/12 सदरी दिसून येत आहे. तसेच 7/12 सदरी कांदळवन अशी कोणतीही नोंद नाही. तसेच प्रस्तूत प्रकरणी क्षेत्र कांदळवन म्हणून शासनाकडून घोषीत करणेत आलेले नाही. प्रस्तूतचे क्षेत्रात कांदळवन नसल्याचे पंचयादीवरुन दिसून येते. निवासी नायब तहसिलदार रत्नागिरी याचा दिनांक 2-03-2019 रोजीचा अहवाल, पंचनामा, श्री. विजय सिताराम राजवाडकर यांचा जबाब यासोबत सादर करणेत येत आहे.

आपला विश्वासू,

उपविभागीय अधिकारी
रत्नागिरी उपविभाग

स्थळप्रत मा.उ.वि.अ.र.यांचे सहीची असे.

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, रत्नागिरी**
यांचे कार्यालय, ता.जि. रत्नागिरी
पिनकोड:-415612 ,दुरध्वनी फोन:-02352 223127,
email :- tah_ratnagiri@rediffmail.com

क्र.तह/जबाबी-2/निवेंडी स्थळ पहाणी/2019 दिनांक:- 02/03/2018

प्रति,

मा.उपविभागिय अधिकारी
रत्नागिरी

विषय – मौजे निवेंडी येथील स.नं.151/1 क्षेत्र 1-97-40 या मिळकतीतील कांदळवनातील झाडे श्री.विजय सिताराम राजवाडकर यांनी बेकायदेशीरपणे तोडल्याबाबत.

संदर्भ – आपलेकडील पत्र क्र.उविअर/एलएनए/तक्रार अर्ज/कावि/135/2019 दिनांक 28/01/2019

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मौजे निवेंडी ता.रत्नागिरी येथील स.नं.151 हि.नं. 1 या मिळकतीत श्री.विजय सिताराम राजवाडकर यांनी कांदळवन झाडे तोडून नष्ट केली असल्याबाबतचा श्री.महेश धोंडू चव्हाण रा.भोम ता.चिपळून यांचा प्राप्त झालेला तक्रार अर्ज या कार्यालयाकडे चौकशी साठी प्राप्त झालेला आहे.

सदर प्रकरणी परिक्षेत्र वन अधिकारी रत्नागिरी यांचे समवेत दिनांक 02/03/2019 रोजी सकाळी 12-00 वाजता मौजे निवेडी येथे स्थळ पहाणी करण्यात आली. त्यावेळी अर्जदार मुंबई येथे असल्याने उपस्थित नव्हते. सदर स्थळ पहाणीस मंडळ अधिकारी मालगुंड , परिक्षेत्र वन अधिकारी यांचे कर्मचारी , भगवती नगर(निवेंडी) चे् सरपंच , पोलीस पाटील व जमिन मालक श्री.विजय सिताराम राजवाडकर , पंच तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

सर्व प्रथम श्री.महेश धोंडू चव्हाण रा.भोम ता.चिपळूण यांचे तक्रार अर्जाचे वाचन केले. त्यानंतर श्री.विजय सिताराम राजवाडकर यांनी वरील स.नं.च्या चारही बाजूनी हद्द समजावून दिल्या. त्यानंतर सदरचे क्षेत्र फिरून पहाता सदर क्षेत्रात साफसफाई केलेली दिसून आली. साफ सफाई केलेल्या क्षेत्राचा अंदाज करता सुमारे 35 गुंठे इतक क्षेत्र होत आहे. या क्षेत्रामध्ये श्री.चव्हाण यांनी जी झाडे आहेत ती उन्मळून

ठिकाठिकाणी जाळलेली दिसून येत असून उन्मळून काढलेले झाडे कोणत्याप्रकारची आहेत याची खात्री करता ती सुबाभुळ 5 झाडे, मोहट 5 झाडे, आकेशिया 3 झाडे, बांबू बेट 2, हुरी 12, व तिवर 2 अशी एकूण 27 झाडे होत आहेत. सदरची ही झाडे झुडपे जाग्यावर ठिकठिकाणी पडलेली आहेत. मोहट झाड 1 हे 110 से.मी. चे असून बाकी सर्व झाडे 15 ते 40 से.मी वेठीची आहेत. सदर झाडापासून निघणा-या किटा मालाबाबत अंदाज करता सुमारे 15.00 घ.मी.इतका होईल. सदरचा लाकुड माल श्री.विजय राजवाडकर यांचे ताब्यात पावतीने दिलेला असून त्याचा पुढील निर्णय होई पर्यत जागेवरून न हलवण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. सदर जमिनीचा 7/12 पहाता मालकी 7/12 दिसून येत असून 7/12 वर कांदळवन अशी कोणतीही नोद दिसून येत नाही. मात्र भात शेती अशी नोंद दिसून येत आहे. तसेच दाखवलेले क्षेत्र हे कांदळवन क्षेत्र असल्याचे वाटत नाही. श्री.राजवाडकर यांनी दाखवलेल्या क्षेत्राप्रमाणे आजूबाजुची माहिती घेता दक्षिणेकडील भागात मालकी क्षेत्र दिसून येत आहे. उत्तरेकडील बाजूने बंधारा, पश्चिमेकडील बाजून खाडी भाग तसेच पूर्वेकडील बाजूने मालकी क्षेत्र दिसून येत आहे. मात्र सदर क्षेत्रातील केलेल्या कामकाजाबाबत श्री.विजय सिताराम राजवाडकर यांना विचारणा करता ही साफसफाई आपण स्वत: केलेली असल्याचे सांगत असून हे काम नारळ झाडे लावण्यासाठी केलेले असल्याचे सांगत आहेत. तसेच सदर क्षेत्रात पंच नाम्यात नमूद केलेल्या झाडा व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या झाडांची बुंदे दिसून येत नाही. तसेच नमूद केलेले 35 गुंठे क्षेत्र हे उकरलेंल्या स्थितीत दिसून येत आहे.

तरी वरिल प्रमाणे वस्तूस्थिती असून वस्तूस्थिती दर्शक अहवाल स्थळपहाणी पंचयादी जबाब व पावतीसह सविनय सादर करण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

(डॉ.बाळासाहेब दराडे)
निवासी नायब तहसीलदार
रत्नागिरी

पंचनामा

(1) श्री विनायक अशोक राजवाडकर व.व.३७ रा. निवेंडी ता.जि. रत्नागिरी धंदा शेती.

(2) श्री. मंगेश शंकर गडदे व.व.२८ रा. निवेंडी ता.जि. रत्नागिरी धंदा शेती.

आम्ही पंचास निवासी नायब तहसीलदार रत्नागिरी, मंडळ अधिकारी मालगुंड व वन अधिकारी पाली व त्यांचेकडील स्टाफ असे मिळून मौजे निवेंडी सं.क्र. १५१/७ मध्ये जमलो आहोत. सदर ठिकाणी आम्हा पंचास मा. निवासी नायब तहसीलदार रत्नागिरी यांनी श्री महेश धोंडू चव्हाण रा. [illegible] ता. चिपळूण यांचे नावे असलेला तक्रार अर्ज वाचून दाखविला व सदर तक्रार अर्जाचे मजकुराप्रमाणे वस्तुस्थितीबाबत खात्री करून पंचनामा लिहून देणेस सांगितल्यामुळे आम्ही पंच पंचनामा लिहून देतो तो खालीलप्रमाणे.

आम्ही वरीलप्रमाणे सदर शेतात असून यावेळी अगवतीनुसार गावच्या सरपंच उपस्थित आहेत. यावेळी तक्रार अर्जदार यांची माहिती घेता ते मुंबई येथे गेलेले असल्याने उपस्थित नसलेबाबत माहिती मिळाली आहे. यानंतर आम्ही पंचांनी श्री विजय सिताराम राजवाडकर यांना वरील नमूद केलेल्या संबंधाबद्दल विचारणा केली असता चारही बाजू हद्दी समजावून दिल्या. त्यानंतर सदरचे क्षेत्र फिरून पाहता सदर शेतात साफसफाई केलेली दिसून आली. साफसफाई केलेल्या क्षेत्राचा अंदाज करता सुमारे ३५ गुंठे इतके क्षेत्र आहे. या क्षेत्रामध्ये श्री चव्हाण यांनी जी झाडे आहेत ती उन्मळून ठिकठिकाणी टाकलेली दिसून येत असून उन्मळून टाकलेली झाडे कोणत्या जातीची आहेत याबाबत खात्री करता सुबाभूळ-५, मोहट-५, आकेशिया-३, बांबू बेट-२, हुरी-१२, व तिवर-२ असे असून ती एकूण २७ इतकी झाडे आहेत. सदरची ही झाडे झुडपे जागेवर ठिकठिकाणी अखंड अवस्थेत पडलेली आहेत. मोहट झाड एक हे १०० से.मी. घेर असून बाकीची सर्व झाडे १५ ते ४० से.मी. घेराची आहेत. सदर झाडांपासून निघणाऱ्या [illegible] बाबत अंदाज करता सुमारे १५.०० घ.मी. इतका होईल. सदरचा [illegible] माल श्री विजय राजवाडकर यांचे ताब्यात पावतीने दिलेला असून त्याचा पुढील निर्णय होईपर्यंत जागेवरून न हलविणेबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. सदरचा ७/१२ पाहता मालकी सात बारा दिसून येत असून सात बाराला कांदळवन अशी कोणतीही नोंद दिसून येत नाही मात्र आलशेती अशी नोंद दिसून येत आहे तसेच दाखविलेले क्षेत्र हे कांदळवन क्षेत्र असल्याचे वाटत नाही

माहिती घेता दक्षिणेकडील भागात माळी क्षेत्र दिसून येत आहे. उत्तरेकडील बाजूने बंधारा पश्चिमेकडील बाजूने झाडी भाग दिसून येत आहे तसेच पुर्वेकडील बाजूनेही माळी क्षेत्र दिसून येत आहे. मात्र सदर क्षेत्रातील केलेल्या कामकाजाबाबत श्री विजय सिताराम राजवाडकर यांना विचारणा करता हे साफ सफाई आपण स्वतः केलेली असल्याचे सांगत असून हे काम साधारण आठ [illegible] केलेले असल्याचे माहिती देत आहेत. तसेच सदर क्षेत्रात पंचनाम्यात नमुद केलेल्या झाडांव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारच्या झाडाचे बुंधे दिसून येत नाहीत. पंचनाम्यात नमुद केलेले सुमारे ३५ हेक्टर क्षेत्र हे उजाड्या अवस्थेत दिसून येत आहे म्हणून वस्तुस्थितीप्रमाणे लिहून दिला पंचनामा.

स्थळ: निवंडी

दिनांक: २/३/२०१९

वि. अ. राजवाडकर

समक्ष

मंगेश शं. गाडे

(सही) मायंगडे

सरपंच ग्रामपंचायत

भगवतीनगर

(सही)

पो. पाटील

ग्रा. निवंडी

(सही)

डॉ. बाळासाहेब दराडे

तिवारी नायब तहसिलदार

(सही)

विजय राजवाडकर

(सही)

तलाठी

(सही)

वनरक्षक [illegible]

(सही)

मंडळ अधिकारी मालगुंड

# जबाब

मा. निवासी नायब तहसीलदार रत्नागिरी यांचेसमोर

लिहून देणार : श्री विजय सिताराम राजवाडकर रा. निवेंडी व.व. ४८ ता.जि. रत्नागिरी

कारणे जबाब लिहून देतो की निवेंडी या गावचा रहिवासी असून निवेंडी येथील सर्व्हे १५४/१ हे क्षेत्र आमचे सामाईक मालकीचे आहे. या क्षेत्रामध्ये मी स्वत: मालक तसेच श्री सुरज शंकर भारती असे हिस्सेदार असून सदर क्षेत्रामधील काही क्षेत्र साफसफाई केलेले आहे व या क्षेत्रामध्ये आम्ही झाड लावणार आहोत. या क्षेत्रामध्ये आम्ही खैराची झाडे तोडून नष्ट केली अशी तक्रार अर्ज श्री … यांनी … केलेला असल्यामुळे त्याच्या चौकशीकामी आपण समक्ष जागेवर येऊन मी आपल्याला जी वस्तुस्थिती दाखविली त्याचा पंचनामा केलेला आहे व तो मला मान्य आहे. चौकशी वेळी तक्रारदार हे … असून ते चौकशीवेळी मुंबई येथे गेलेले असल्याची माहिती मिळालेली आहे. सदरचे क्षेत्र हे माझ्या मालकीच्या … लागूनच असलेले क्षेत्र आहे तसेच सदर क्षेत्रात … येत आहे मी जी साफसफाई करून झाडे झुडपे उकरून काढलेली असून ती ठिकठिकाणी जागेवरतीच आहेत व त्यापासून … जागेवर जाळून नष्ट केलेली आहे. माझा ही साफसफाई मी स्वत: व माझे एक हिस्सेदार श्री भारती असा दोघे मिळून केलेले आहेत उकरून काढलेली झाडे ही जागेवरतीच अखंड अवस्थेत असून त्या झाडांपासून मिळणाऱ्या जळाऊ मालाचा अंदाज केलेला असून तो सुमारे १५.०० घ.मी. इतका झालेला आहे, तो माझ्या ताब्यात असून त्याचा पुढील निर्णय होईपर्यंत जागेवरून न हलविणे बाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. जागेवर उकरून काढलेली झाडे ही … ५, …-५, …-३, …-२, … १२ वगैरे … झाडे एकूण २७ झालेली आहेत सदर साफसफाईमुळे … असून तो मला मान्य आहे व याबाबत मी … तयार आहे. या व्यतिरिक्त सदर क्षेत्रातील मी कोणत्याही प्रकारच्या झाडांची तोड केलेली नाही किंवा कोणतेही … तसेच तक्रार अर्जदार यांच्या या जागेशी कोणताही संबंध येत नाही. सदरचा जबाब मी माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिलेला असून तो बरोबर असल्याची खात्री झाल्याने सही केली आहे. दि. २/३/२०१८

श्री राजवाडकर यांनी दिलेला जबाब बरोबर असून मी त्यामध्ये हिस्सेदार असल्याने सही करत आहे

सरपंच